ORDER
Issue notice to I.O. and APP
R/o 17/02/2026

Digitally signed by PANKAJ BHAGATSING RAJPUT
Date: 2026.01.27 15:18:23 +0530

फौजदारी किरकोळ अर्ज 111/2026
२०२६

EXH.1

# मे. मुख्य न्यायदंडाधिकारीसो, कोल्हापूर

यांचे कोर्टात

श्री. सुहास गणेश फणसाळकर
व.व. ७०, व्यवसाय- रिटायर, -- अर्जदार
रा. २०१, साची रेसीडेन्सी फेज-२,
राजेंद्रनगर, कोल्हापूर.

विरूद्ध.

महाराष्ट्र शासन तर्फे
सायबर क्राईम विभाग -- वि.प.
एस.पी.ऑफीस कसबा बावडा,
कोल्हापूर.

**ऑकनॉलेजमेंट नं.**

१) ३१९१२२५०२३०२८५ **बी.एन.एस.एस. २०२३ चे**

२) ३१९१२२५०२३०२४० **कलम ५०३ प्रमाणे जप्त**

**मुद्देमाल परतीसाठी अर्ज**

**यातील अर्जदार मे. कोर्टात नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे :**

१) यातील अर्जदार हे कोल्हापूर मधील राजेंद्रनगर येथील कायमचे रहिवाशी आहेत. त्यांनी त्यांची संपूर्ण नोकरी रत्नागिरी येथील जे. के. फाईल्स प्रा. लि. या कंपनीमध्ये केली व येथून रिटायरमेंट घेऊन ते कोल्हापूर येथे कायमस्वरूपी

Assistant Superintendent

राहणेस आले. अर्जदार पहिल्यांदा दि.१६/०६/२०२५ इ. रोजी ई मेल द्वारे Quanto Pulse.Com नावाच्या (कंपनीच्या) (आरोपी) संपर्कामध्ये आले. य वेबसाईटद्वारे अर्जदार यांना कंपनीबद्दल व त्यामध्ये ट्रेडींग बद्दल संपूर्ण माहिती मिळाली व कंपनीमधील एका कर्मचाऱ्याने त्यांच्या (कंपनीमध्ये) (आरोपी) ट्रेडींगद्वारे काही रक्कम स्टॉक मार्केट मध्ये गुंतवण्याकरीता सांगितली. सदरची रक्कम आमच्या कंपनीमधील काही तज्ञ कर्मचारी तुमच्या वतीने पैसे गुंतवतील असे सांगितले व तसे केले असता काही दिवसातच तुम्हाला दुप्पट पैसे मिळतील हे देखील सांगितले असता अर्जदार यांना सदर (कंपनीमध्ये) (आरोपी) पैसे गुंतवणे योग्य वाटले कारण सदरची कंपनी ही (SEBI) रजिस्टर आहे. अर्जदार यांनी प्रथम दि.१६/०६/२०२५ रोजी रक्कम रू.४,२०२/- व दि. १९/०६/२०२५ रोजी रू.८,४०४/- ऐवढे पैसे कर्मचाऱ्यांच्या खातेवर पेटीएम या ॲपद्वारे भरले.

२) कंपनीमधील सम्राट नावाच्या व्यक्तीने मला पैसे गुंतवणूकीसाठी एक लिंक पाठवली (Trade Quanta-Pulse.com) व वॉट्सअप नंबर दिला ४४७९११९२६५८१५ तो नंबर परदेशातला (यु.के.) त्या लिंकवर मी पुढे गेलो असता मला असे समजले की पुढील गुंतवणूक करणेसाठी मला अजून पैशाची गरज लागणार आहे. त्यावेळी सम्राट नावाच्या कंपनीच्या कर्मचाऱ्याने अर्जदारांना अजून ५५,०००/- इतकी रक्कम भरण्यास सांगितली व ती रक्कम अर्जदारांनी पेटीएम द्वारे भरली. त्यानंतर काही दिवसांनी अर्जदार यांना तुम्ही भरलेल्या रक्कमेमध्ये काही तांत्रिक अडचण आली असे सांगितले व यापुढे तुम्ही अजून ७०,०००/- इतकी रक्कम भरा असे सांगितले त्यावेळक्ष अर्जदार यांनी त्यास नकार दिला.

३) त्यानंतर काही दिवसांनी आरोपीने परदेशातून अर्जदार यांना फोन करत स्वत: इथून पुढे मी तुमचे पैसे गुंतवतो असे सांगितले. दि.३/९/२०२५ रोजी **बारकलेज बँक ऑफ युनायटेड किंगडम** या बँकेकडून US $ 28,600 (२५

Assistant Superintendent

लाख) इतकी रक्कम Quanta Pulse या आरोपी कंपनीने आपल्या नावावर माझ्या नावाने घेतली. त्यानंतर दि.५/९/२०२५ रोजी **बारकलेज बँक ऑफ युनायटेड किंगडम** या बँकेने अर्जदार बरोबर फोन वरून संवाद साधून सर्व KYC ची पुर्तता केली व त्यानंतर सदरची रक्कम रू.२५ लाख अर्जदार यांना परतावा म्हणून पाहिजे असल्यास अर्जदार यांनी रक्कम रू.१,२६,०६५.६५ त्यांच्या **बँक ऑफ इंडिया (शाखा मिरजोळे)** येथून NEFT द्वारे दि.१०/९/२०२५ रोजी भरली. गुंतवणूकीतून झालेला फायदा काढून घेणेसाठी आपणास पुढील रक्कम भरावी लागेल असा तगादा आरोपीने लावला. त्याचबरोबर U.K.Govt. च्या नियमानुसार सदरची रक्कम पाहिजे असलेस १२% टॅक्स म्हणून रक्कम रू.३,०२,५०५.६५ दि.१०/९/२०२५ इ. रोजी NEFT ने भरली व त्यानंतर त्याच दिवशी NEFT द्वारे रक्कम रू.२,००,०००/- दि.१०/९/२०२५ रोजी (Refundable deposit) म्हणून बँकेत भरले. त्यानंतर दि.१८/९/२०२५ इ. रोजी अर्जदार यांनी Financial Intelligence Unit (FIV) च्या सांगण्यावरून स्टॅम्प ड्युटी म्हणून रक्कम रू.१,५२,५०२/- इतकी रक्कम NEFT द्वारे बँकेच्या इतर कर्मचाऱ्यांच्या अकाऊंटवर Quanta-Pulse च्या सांगण्यावरून स्टॅम्प ड्यूटी म्हणून रक्कम रू.१,५२,५०२/-इतकी रक्कम NEFT द्वारे बँकेच्या इतर कर्मचाऱ्यांच्या अकाऊंटवर Quanta-Pulse च्या सांगण्यावरून NEFT द्वारे भरल्यावर वर नमुद सर्व रक्कमा अर्जदार यांनी आपल्या बँक ऑफ इंडियाच्या अकाऊंट नं. १४३५१०१००००५८३ या सेव्हिंग खात्यावरून भरल्या. परंतु वर नमूद रक्कम रू.२५,००,०००/- (रू.पंचवीस लाख फक्त) अर्जदार यांनी परतावा म्हणून दिसत होती. ती व्हर्च्युअल होती. त्यानंतर अर्जदार यांना वर नमुद आरोपी व त्यांची बँक याबाबत संशय आलाकारण संपूर्ण पैसे भरल्यानंतर दोघेही आरोपी यांचे फोन कॉल व मेसेजला परत रिप्लाय देत नव्हते. आरोपीने अर्जदार यांना तुम्ही ४०,०००/- रक्कम भरा आम्ही रू.२,००,०००/- रक्कम भरतो असे केले की तुमच्या खात्यावर ७,००,०००/- इतकी रक्कम जमा होईल याची हमी व खात्री दिली. त्यानंतर अर्जदार यांनी पुन्हा ४०,०००/- रक्कम आरोपीच्या अकाऊंटवर भरली व

Assistant Superintendent

त्यानंतर आरोपीने अर्जदार यांचे फोन उचलणे बंद केले व त्यांच्या मेसेजला परत रिप्लाय दिला नाही. त्यानंतर अर्जदारांना आपली फसवणूक झाली आहे असे लक्षात आले.

४) त्यानंतर अर्जदार यांनी त्वरीत ऑनलाईन तक्रार सायबर क्राईम विभाग राजारामपूरी पोलीस स्टेशनच्या १९३० च्या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करून आपली अधिकृत तक्रार नोंदवली.

५) सदरच्या प्रकरणामध्ये अर्जदार यांची एकूण रू.८,८८,७०६/- इतक्या रूपयांची आरोपीने अर्जदारांचा विश्वास संपादन करून जाणून बुजून फसवणूक केली आहे.

६) सदर तक्रारी सायबर क्राईम पोर्टलवर ॲकनॉलेजमेंट नं. १)३१९१२२५०२३०२८५, २) ३१९१२२५०२३०२४० या क्रमांकाने रजिस्टर आहेत. सदर तक्रारींची दखल घेत सखोल तपास केला असता सायबर क्राईम विभागास आरोपींच्या वेगवेगळ्या खात्यांवर अर्जदारांची रक्कम रू.३,२५,०००/- इतकी रक्कम अर्जदारांची स्वमालकीची असल्यास सायबर विभागाने बँकेकडून खात्री करून घेतली. त्यानंतर पोलीसांनी तात्काळ या सर्व वेगवेगळ्या खात्यांवरील रक्कम होल्ड/लिन मार्क करून सदर वेगवेगळे बँक खाते फ्रिज केले आहे.

७) होल्ड/लिन असलेल्या रक्कमांचा तपशिल परिशिष्ठ (अ) व परिशिष्ठ (ब) मध्ये दिलेला आहे तो नि. १ चा भाग समजणेत यावा. सदरच्या रक्कमा अर्जदार यांच्या खातेवरून गेलेने ती अर्जदार यांच्या मालकीची आहे. सबब ती परत मिळणे कायद्याने आवश्यक व जरूरीचे आहे.

८) सदर गुन्ह्याचा तपास होवून गुण दोषांवर चालून निकाल होणेस काही कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या काळात सदरची रक्कम रू.३,२५,०००/- ही

Assistant Superintendent

आरोपीच्या खात्यावर राहिलेस त्याचा गैरवापर होणेची दाट शक्यता आहे असे झालेस अर्जदारांचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे.

९) वर नमुद रक्कम ही अर्जातील जप्त मुद्देमाल असून तो परत मिळणेकरीता सदरचा अर्ज केलेला आहे. सदर रक्कम अर्जदारांना मिळणे न्यायाचे असून ते कोर्ट सांगितल त्या अटी व शर्ती वर बॉण्ड देणेस तयार आहेत.

१०) यातील अर्जदार सोडून इतर कोणीही सदर रक्कमेचा ताबा मागत नाही.

११) **सबब यातील अर्जदार यांची नम्र विनंती की,**

अ) अर्जदारांचा अर्ज मंजूर करणेत यावा.

ब) अर्जदारांच्या स्वमालकीची रक्कम रू.३,२५,०००/- जी परिशिष्ठ (अ) व (ब) मध्ये वेगवेगळ्या खात्यांमध्ये होल्ड/लिन आहेत. त्या सर्व बँकांना सायबर पोलिस संबंधित अधिकारी राजारामपूरी पोलीस ठाणे यांचेमार्फत अर्जदारांचे पुढील बँक खातेवर पैसे वर्ग करणेबाबत योग्य ते निर्देश देण्यात यावेत.

अर्जदार यांचे बँकेचा तपशिल

| | | |
|---|---|---|
| बँकेचे नांव | : | बँक ऑफ इंडिया राजारामपूरी ब्रँच |
| अकाऊंट नं. | : | . |
| IFSC Code | : | . |

SGPhansalkar.

क) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

**प्रतिज्ञा**

मी यातील अर्जदार श्री. सुहास गणेश फणसाळकर, व.व. ७०, व्यवसाय- रिटायर, रा. २०१, साची रेसीडेन्सी फेज-२, राजेंद्रनगर, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

दिनांक : ०८/०१/२०२६

कोल्हापूर.

SGPhansalkar.

Assistant Superintendent

## ॲफिडेव्हीट

मी यातील अर्जदार श्री. सुहास गणेश फणसाळकर, व.व. ७०, व्यवसाय-रिटायर, रा. २०१, साची रेसीडेन्सी फेज-२, राजेंद्रनगर, कोल्हापूर सत्य शपथेवर ॲफिडेव्हीट करतो की, वरील अर्जामधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट.

दिनांक : ०८/०१/२०२६

कोल्हापूर.

(Adv A A Morbale)

मी ॲफिडेव्हीट करणार

यांस ओळखतो.

## प्रतिज्ञा

मी यातील अर्जदार श्री. सुहास गणेश फणसाळकर, व.व. ७०, व्यवसाय-रिटायर, रा. २०१, साची रेसीडेन्सी फेज-२, राजेंद्रनगर, कोल्हापूर सत्य प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की, वरील अर्जातील व ॲफिडेव्हीटमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा.

दिनांक : ०८/०१/२०२६

कोल्हापूर.

Solemnly Affirmed before me by
Shri Suhas Ganesh Phansalkar
Age 70 of Retired who is
identified by Shri Adv A A Morbale
.............whom I know personally
Dated :- 8.1.26

Assistant Superintendent